ePaper
दोन्ही राष्ट्रवादी पुन्हा एकत्र येणार? सुनेत्रा पवारांनी स्पष्टच सांगितलं
| वर्ष - 8 | अंक - 290 | UDYAM-MH-26-0158827 |



# महाईन्यूज ™

## आतील पानांत

- हेनरिक क्लासेनचा क्लास!
- शेवटच्या सामन्यात चेन्नईचा विजय!
- पाकिस्तानला किंमत मोजावी लागेल
- पाकिस्तान धोका म्हणून पाहतो...

www.mahaenews.com | सोमवार, दि. 26 मे 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!



## जपानला मागे टाकत भारतीय अर्थव्यवस्थेने जगातील चौथ्या क्रमांकावर झेंडा रोवला



# भारत जगातील चौथी मोठी अर्थव्यवस्था!

## आता फक्त जर्मनी, चीन आणि अमेरिका पुढे


। पुणे । प्रतिनिधी । महाईन्यूज

भारताने अखेर इतिहास घडवला. अनेक संकटांवर मात करत भारतीय अर्थव्यवस्थेने जगातील चौथ्या क्रमांकावर झेंडा रोवला आहे. अमेरिकेने भारताची आर्थिक कोंडी करण्याचा प्रयत्न केला. तरीही भारतीय अर्थव्यवस्थेने राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे डोळे पांढरे केले आहे. जपानला मागे सारत भारताने चौथ्या क्रमांकावर झेप घेतली आहे. तर आता जगातील तिसरया सर्वात मोठ्या अर्थव्यवस्थेकडे भारताची आगेकूच सुरू आहे. विशेष म्हणजे तिसरा टप्पा भारताच्या दृष्टिक्षेपात आला आहे. भारताने जपानला मागे टाकून जगातील चौथ्या क्रमांकाची सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनण्याचा ऐतिहासिक टप्पा गाठला आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (IMF) च्या 2025 च्या अंदाजानुसार, भारताचे नाममात्र GDP $4.187 ट्रिलियन (सुमारे ₹332 लाख कोटी) इतके असून, जपानच्या $4.186 ट्रिलियन GDP पेक्षा थोडेसे अधिक आहे .

### भविष्यातील दृष्टीकोन

» नीती आयोगाचे CEO बी. व्ही. आर. सुब्रह्मण्यम यांच्या मते, भारत पुढील 2.5 ते 3 वर्षांत जर्मनीला मागे टाकून जगातील तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनू शकतो.

| क्रमांक | देश | GDP (अमेरिकन डॉलर ट्रिलियनमध्ये) |
|---|---|---|
| 1 | अमेरिका | 30.51 |
| 2 | चीन | 19.23 |
| 3 | जर्मनी | 4.74 |
| 4 | भारत | 4.19 |
| 5 | जपान | 4.18 |



» या दशकात भारताने आपले GDP दुप्पट केले आहे, जे जागतिक स्तरावर एक उल्लेखनीय कामगिरी मानली जाते .

### भारताच्या आर्थिक प्रगतीची ठळक वैशिष्ट्ये

» GDP वाढीचा प्रवास (2015–2025)
2015: $2.1 ट्रिलियन
» 2025: $4.2 ट्रिलियन
» वाढ: 100% पेक्षा अधिक

### चौथी मोठी अर्थव्यवस्था

नीती आयोगाचे सीईओ बीवीआर सुब्रमण्यम यांनी ही आनंदवार्ता दिली आहे. सुब्रमण्यम यांनी नीती आयोगाच्या 10 व्या गव्हर्निंग काऊंसिलच्या बैठकीनंतर ही घोषणा केली. भारतासाठी आता जोरदार स्थिती आहे. देशाची आर्थिक स्थिती मजबूत आहे. सुब्रमण्यमने वृत्तसंस्था पीटीआयला सांगितले की, आता आपण जगातील चौथी सर्वात मोठी अर्थव्यवस्था आहे. आता आपली अर्थव्यवस्था 4




ट्रिलियन डॉलर इतकी झाली आहे. सुब्रमण्यम यांनी जागतिक नाणेनिधीच्या आकड्यांचा आधार घेत चौथ्या अर्थव्यवस्थेचा मैलाचा दगड रोवल्याची माहिती दिली. IMF नुसार, भारताची अर्थव्यवस्था जपानपेक्षा पण मोठी झाली आहे. आता अमेरिका, चीन आणि जर्मनी हे भारताच्या पुढे आहेत. जर भारत नियोजनाप्रमाणे घौडदौड करत राहिला तर येत्या 2.5 ते 3 वर्षात भारत, जर्मनीला मागे टाकत तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था होईल.

### सध्या भारतात वस्तू तयार करणे स्वस्त

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प सत्तेवर आल्यापासून त्यांनी चीन आणि भारतासह युरोपाच्या मुसक्या आवळण्याचा एकहाती कार्यक्रम सुरू केला आहे. चीन आणि भारतावर ट्रम्प यांचा विशेष रोष दिसून येत आहे. मी म्हणेल तसे वागा तरच कर आणि व्यापार सवलत मिळतील असा दम ते भरत आहेत.

त्यांनी आता ॲप्पल कंपनीने आयफोन अमेरिकेतच तयार करावा, भारतात नाही, अशी भूमिका घेतली आहे. नाहीतर 25 टक्क्यांपर्यंत टॅरिफ लावण्याची धमकी दिली आहे. यावर नीती आयोगाचे सीईओ सुब्रमण्यम यांनी टॅरिफचे काय होईल, हे सांगणे अवघड आहे. पण भारतात वस्तू तयार करणे, उत्पादन तयार करणे स्वस्त असल्याचे सुब्रमण्यम म्हणाले. देशातील सरकारी संपत्ती भाड्याने, किराया तत्वावर देण्याविषयी त्यांनी स्पष्ट केले आहे.

### भारताच्या आर्थिक यशामागील प्रमुख घटक

**उत्पादन खर्च कमी:** भारतामध्ये उत्पादन खर्च तुलनेने कमी असल्यामुळे जागतिक गुंतवणूकदार भारताकडे आकर्षित होत आहेत.
‘मेक इन इंडिया’ आणि औद्योगिक धोरणे: या उपक्रमांमुळे औद्योगिक विकासाला चालना मिळाली आहे.
**सेवा क्षेत्राचा वाढता वाटा:** सेवा क्षेत्राचा GDP मध्ये वाटा 54.7% आहे, ज्यामुळे आर्थिक वृद्धीला बळकटी मिळाली आहे .
**युवाशक्ती आणि डिजिटल परिवर्तन:** भारताची युवा लोकसंख्या आणि डिजिटल तंत्रज्ञानाचा वाढता वापर हे आर्थिक वृद्धीचे महत्त्वाचे घटक आहेत.

ePaper
दोन्ही राष्ट्रवादी पुन्हा एकत्र येणार? सुनेत्रा पवारांनी स्पष्टच सांगितलं
| वर्ष - 8 | अंक - 290 | UDYAM-MH-26-0158827 |



महाईन्यूज™

## आतील पानांत


- हेनरिक क्लासेनचा क्लास!
- शेवटच्या सामन्यात चेन्नईचा विजय!
- पाकिस्तानला किंमत मोजावी लागेल
- पाकिस्तान धोका म्हणून पाहतो...


www.mahaenews.com | सोमवार, दि. 26 मे 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## 12 दिवस आधीच मान्सून कोकणात दाखल

# अवचित प्रकटला मान्सून!

## हवामान विभागाची घोषणा, कोकणात अतिमुसळधार पावसाचा इशारा

। पुणे । प्रतिनिधी । महाईन्यूज

**संपूर्ण राज्यासाठी आणि बळीराजासाठी आनंदाची बातमी असून मान्सून महाराष्ट्रात दाखल झाला आहे. तब्बल 12 दिवस आधीच मान्सून तळकोकणातील देवगडमध्ये दाखल झाल्याची घोषणा हवामान विभागाने केली आहे. महाराष्ट्रमध्ये साधारण 7 जूनला मान्सून दाखल होतो. मात्र यंदा वेळेच्या आधीच मान्सून महाराष्ट्रात दाखल झाला आहे. त्यामुळे सर्वसामान्यांसह शेतकऱ्यांनाही मोठा दिलासा मिळाला. राज्यातील काही भाग मान्सूनने व्यापला आहे. दरम्यान दुसरीकडे सध्या राज्यातील अनेक भागांमध्ये अतिमुसळधार पाऊस सुरू असल्याचं पाहायला मिळत आहे, चिंतेंची बाबत म्हणजे पुन्हा एकदा हवामान विभागाकडून राज्यातील अनेक भागांमध्ये मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे.**



### पुढील काही तास धोक्याचे, रायगड, सातारा या जिल्ह्यांना रेड अलर्ट

### मान्सून तळकोकणात दाखल

नैऋत्य मान्सूनने भारतात एन्ट्री केली असून केरळ, कर्नाटकचा बहुतांश भाग, संपूर्ण गोवा आणि महाराष्ट्रातील तळकोकण व्यापला आहे. तळकोकणातील देवगडमध्ये मान्सून दाखल झाला असून पुढचे पाच दिवस रत्नागिरी आणि सिंधुदुर्गमध्ये मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

### कोकण, कोल्हापूरमध्ये मुसळधार पाऊस

पुढच्या तीन दिवसात मान्सूनसाठी पूरक परिस्थिती असून महाराष्ट्राच्या अनेक भागात मान्सून दाखल होण्याची शक्यता मुंबईतील प्रादेशिक हवामान खात्याने वर्तवली आहे. पुढच्या पाच दिवसांसाठी कोल्हापूर, कोकणामध्ये मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. कोकणातील सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगडचा काही भाग, तर पश्चिम महाराष्ट्रातील कोल्हापूर आणि सांगली-साताऱ्याच्या काही भागासाठी अलर्ट जारी करण्यात आला आहे. महाराष्ट्राला पावसानं झोडपून काढलं आहे, राज्यातील अनेक भागांमध्ये मुसळधार पाऊस सुरू असून, बारामतीमध्ये ढगफुटी सदृश्य पाऊस झाला आहे. महाराष्ट्राला पावसाचा तडाखा, पुणे जिल्ह्यात पूरस्थिती, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्रालाही झोडपलं. महाराष्ट्राला पावसानं झोडपून काढलं आहे. इंदापूर – पुणे-सोलापूर महामार्गाला ओढ्याचं स्वरूप प्राप्त झालं आहे. भिगवणमध्ये अतिमुसळधार पाऊस झाला आहे. इंदापूर तालुक्यात पावसामुळे अनेक ठिकाणी झाडे कोसळली असून, वाहतुकीला मोठा फटका बसला आहे. मोठी वाहतूक कोंडी निर्माण झाली असून, अनेक ठिकाणी घरांमध्ये पाणी घुसल्याच्या घटना घडल्या आहेत.

### पुणे जिल्ह्यात पूरस्थिती

इंदापूर तालुक्यातील भिगवणमध्ये सकाळपासून मुसळधार पावसाने थैमान घातलं आहे, मुसळधार पावसामुळे संपूर्ण भिगवण परिसर जलमय झाला आहे. विशेषतः पुणे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गालगतच्या सर्विस रोडला तळ्याचं स्वरुप प्राप्त झालं आहे. हा संपूर्ण रस्ता पाण्याखाली गेला आहे. भिगवण बस स्थानकात पूर सदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. भिगवणच्या थोरात नगर भागात रस्त्यावरून पाण्याचे लोंढे वाहताना दिसत आहेत. त्यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण झाला असून, नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. काही घरांमध्ये पाणी देखील शिरलं आहे.

### कालवा फुटला

दुसरीकडे बारामती तालुक्यातून वाहणाऱ्या निरा डावा कालव्याला पिंपळी लिमटेक या ठिकाणी भगदाड पडलं आहे. या कालव्याचे सर्व पाणी नागरिकांच्या शेतात आणि घरामध्ये शिरले असून, यामध्ये मोठ्या प्रमाणामध्ये नुकसान झालं आहे. निरा डावा कालव्याचे आवर्तन सुरूच होते, त्यात मुसळधार पाऊस कोसळत असल्याने कालव्यात पाण्याचा प्रवाह प्रचंड वाढला यामुळे कालव्याला भगदाड पडल्याची माहिती समोर आली आहे. कालव्याला पिंपळी लिमटेक भागात भगदाड पडल्याची माहिती मिळताच जलसंपदा विभागाने तातडीने नीरा डावा कालवा बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. दरम्यान एनडीआरएफच्या दोन टीम दौंड आणि बारामती तालुक्यात दाखल झाल्या आहेत, पुणे ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात पाऊस सुरू असल्यामुळे स्थानिक प्रशासकीय यंत्रणांना सज्ज राहण्याचे आदेश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले आहेत.

### सुप्रिया सुळे यांचं नागरिकांना आवाहन

दरम्यान खासदार सुप्रिया सुळे यांच्याकडून देखील पावसाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना आवाहन करण्यात आलं आहे. 'बारामती लोकसभा मतदारसंघासह पुणे जिल्ह्यातील इतर भागात मोठ्या प्रमाणात पाऊस पडत आहे. गेली तीन चार दिवसांपासून संततधार आहे. यामुळे अनेक ठिकाणी ओढे-नाले दुथडी भरून वाहू लागले असून काही ठिकाणी रस्त्यांवर देखील पाणी आले आहे. माझे नागरीकांना आवाहन आहे की कृपया पुढचे काही दिवस आपण काळजी घ्यावी. गरज असेल तरच घराबाहेर पडावे. याखेरीज जिल्हा प्रशासन, पीएमआरडीए आणि महापालिका आयुक्त यांनाही विनंती आहे की कृपया आपण सततच्या जोरदार पावसाची नोंद घेऊन आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा सक्रीय कराव्या. यासह जेथे पावसाने नुकसान झाले आहे तेथे मदत पोहोचविण्यासाठी तातडीने योग्य ती कार्यवाही करावी.' असं आवाहन सुप्रिया सुळे यांनी ट्विट करत केलं आहे.

### अत्यावश्यक कामाशिवाय घराबाहेर पडू नका

बारामती तालुक्यात अतिवृष्टी होत असून नदी पात्र, कॅनॉल परिसरात नागरिकांनी जाऊ नये, अत्यावश्यक कामाशिवाय घराबाहेर पडू नये, कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, प्रशासनास सहकार्य करावे, आपत्कालीन परिस्थितीच्या काळात प्रशासनाशी संपर्क साधावा.असे आवाहन बारामतीचे तहसीलदार गणेश शिंदे यांनी केले आहे.

# वैष्णवीच्या मारेकऱ्यांना चौकात फाशी द्या!

## आरोपींना फाशी द्याअशी संतप्त प्रतिक्रिया वडेट्टीवार यांनी दिली

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**वैष्णवी आत्महत्या प्रकरणातील आरोपींना भर चौकात फाशी दिली पाहिजे. अशी संतप्त प्रतिक्रिया कॉंग्रेस चे नेते विजय वडेट्टीवार यांनी दिली आहे. आज विजय वडेट्टीवार यांनी कस्पटे कुटुंबाची भेट घेतली. कुटुंबातील सदस्यांच सांत्वन केलं. घटनेची माहिती घेतली.**



वैष्णवीला क्रूर मारहाण झाली आहे. ज्या पद्धतीने वैष्णवीला मारहाण करण्यात आली ते पाहता हगवणे कुटुंब हे राक्षसी प्रवृत्तीचे आहे. वैष्णवीचा हगवणे कुटुंबाने जीव घेतला आहे. अशा प्रवृत्तीला माफ करू शकत नाही. त्यांना भर चौकात फाशी दिली पाहिजे. असे मत त्यांनी व्यक्त केलं आहे. विजय वडेट्टीवार हे पत्रकारांशी बोलत होते.विजय वडेट्टीवार म्हणाले, महिलांवर अत्याचाराच्या प्रमाणात महाराष्ट्र सगळ्या राज्यांच्या पुढे गेल आहे. महिलांच्या, मुलींच्या सुरक्षेच्या संदर्भात मागील पाच वर्षात ६६ हजार महिला बेपत्ता आहेत. दर दोन तास तेरा मिनिटांमध्ये एका महिलेचा खून होतो, किंवा तिच्यावर अत्याचार होतो. ही सगळी परिस्थिती बघता राज्यात कायद्याचा जो धाक असला पाहिजे, तो दिसत नाही. महाराष्ट्र अधोगतीला चालल्याचे हे निदर्शन आहे.राज्याच्या महिला आयोगाला पूर्ण वेळ दिला पाहिजे. दोन- तीन दिवस मी पाहत आहे. महिला आयोगाचा त्यात लक्ष घालण्याचा रोल दिसत नव्हता. पुढं ते म्हणाले, या प्रकरणाची संपूर्ण माहिती आपण कुटूंबाकडून घेतली. क्रुर मारहाणीचे ते सर्व फोटो पाहिले. ज्या पद्धतीने वैष्णवीला मारहाण झाली ते पाहता हगवणे कुटूंब माणूस नाही, राक्षस आहेत. मानवतेला काळीमा फासणारे कृत्य त्या नालायक कुटूंबाने केले आहे. नऊ महिन्याचे बाळ असताना कोणीही आत्महत्या करू शकत नाही. तिला मारून तिचा जीव घेतला आहे. पोलीसांचा तपासही त्या दिशेने झाला पाहिजे. कुठल्याही परिस्थितीत हगवणे कुटूंबासारख्या राक्षसी प्रवृत्तीला माफ करता कामा नये. त्यांना चौकात आणून फाशी दिली पाहिजे. ते फाशी देण्याच्याच लायकीचे आहेत. कोणत्याही पक्षाचा माणूस असेल तर अशा प्रवृत्तीला ठेचले पाहिजे. या प्रकरणात ज्याच्याकडे हे बाळ होते, तो आरोपी निलेश चव्हाण हा फरार आहे.पोलीसानां तो का सापडत नाही, असा सवाल करीत पोलीसांना आजकाल गुंड लवकर मिळत नाहीत. चव्हाण गुंड प्रवृत्तीचा आहे. पोलीसांना तो सापडत नाही, आणि सज्जन माणसाला मात्र लगेच शोधतात. पुढे ते म्हणाले, पोलीस महानिरीक्षक जालींदर सुपेकर यांच नाव याप्रकरणात जोडले जाते, यावर वडेट्टीवार म्हणाले, मी त्याची ऑडीओ क्लीप ऐकली आहे. यात त्यांचा पक्षपातीपणा दिसतोय. ते यात सहभागी आहेत,पण, एक पोलीस अधिकारी म्हणून त्यांची भुमिका नि:पक्षपाती नाही.त्यामुळे त्यांच्यावरही कारवाई झाली पाहिजे.

### अत्याचाराच्या प्रमाणात महाराष्ट्र पुढे

वैष्णवीला क्रूर मारहाण झाली आहे. ज्या पद्धतीने वैष्णवीला मारहाण करण्यात आली ते पाहता हगवणे कुटुंब हे राक्षसी प्रवृत्तीचे आहे. वैष्णवीचा हगवणे कुटुंबाने जीव घेतला आहे. अशा प्रवृत्तीला माफ करू शकत नाही. त्यांना भर चौकात फाशी दिली पाहिजे. असे मत त्यांनी व्यक्त केलं आहे. विजय वडेट्टीवार हे पत्रकारांशी बोलत होते. विजय वडेट्टीवार म्हणाले, महिलांवर अत्याचाराच्या प्रमाणात महाराष्ट्र सगळ्या राज्यांच्या पुढे गेल आहे. महिलांच्या, मुलींच्या सुरक्षेच्या संदर्भात मागील पाच वर्षात ६६ हजार महिला बेपत्ता आहेत. दर दोन तास तेरा मिनिटांमध्ये एका महिलेचा खून होतो, किंवा तिच्यावर अत्याचार होतो. ही सगळी परिस्थिती बघता राज्यात कायद्याचा जो धाक असला पाहिजे, तो दिसत नाही.

# ‘तिसरी भाषा रद्द’च्या शासन निर्णयाची प्रतीक्षा!

## पूर्वीप्रमाणेच कार्यपद्धत ठेवण्याची दादा भुसे यांची घोषणा

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्यात इयत्ता पहिलीपासून तिसरी भाषा लागू करण्याबाबतच्या चर्चेला शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी रविवारी पूर्णविराम दिला. ‘इयत्ता पहिलीपासून तिसरी भाषा लागू करण्याचा निर्णय स्थगित करण्यात आला आहे. त्याबाबत कोणाच्याही मनात काहीही शंका असायला नको. आतापर्यंत जी कार्यपद्धती होती, त्यानुसारच शैक्षणिक कामकाज होईल,’ अशी घोषणा शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी पुण्यात केली. मात्र, तिसऱ्या भाषेच्या स्थगितीबाबतचा शासन निर्णय कधी प्रसिद्ध होईल, याबाबत त्यांनी काही भाष्य केले नाही.**



पुण्यातील गणेश कला क्रीडा मंच येथे आयोजित ‘पुणे बालपुस्तक जत्रे’ला भेट दिल्यानंतर भुसे यांनी माध्यमांशी संवाद साधताना राज्यात पहिलीपासून तिसरी भाषा लागू करण्याचा निर्णय स्थगित केल्याचे स्पष्ट केले. ते म्हणाले, ‘या पूर्वी हिंदी ही तिसरी भाषा म्हणून शिकवण्याचा शासन निर्णय प्रसिद्ध केला होता. त्यातून काही मुद्दे पुढे आले होते. मात्र, विद्यार्थी, त्यांचे पालक यांना कोणत्या विषयासाठी शिक्षण अपेक्षित आहे, कोणत्या वर्गापासून तिसरी भाषा असावी या बाबतच्या सूचना घेतल्या जातील. पुढील काळात त्याबाबत निर्णय घेतला जाईल. मात्र, सध्या आतापर्यंतचीच कार्यपद्धती कायम राहील. राज्यात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०ची शालेय स्तरावरील अंमलबजावणी येत्या शैक्षणिक वर्षापासून करण्यात येणार आहे. त्यासाठी राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेने (एससीईआरटी) राज्य अभ्यासक्रम आराखडा तयार केला. त्यानुसार प्रसिद्ध केलेल्या शासन निर्णयात इयत्ता पहिलीपासून हिंदी ही तिसरी भाषा म्हणून अनिवार्यपणे शिकविण्याचे नमूद करण्यात आले होते. मात्र, पहिलीपासून हिंदी शिकविण्याच्या निर्णयाला राजकीय, शैक्षणिक क्षेत्रातून तीव्र विरोध झाला. त्यानंतर शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी ‘अनिवार्य’ या शब्दाला स्थगिती देऊन अन्य भारतीय भाषांचेही पर्याय उपलब्ध करून देण्याचे जाहीर केले होते. मात्र, त्याबाबतचा अधिकृत शासन निर्णय अद्याप प्रसिद्ध करण्यात आलेला नाही. तसेच, पाठ्यपुस्तके उपलब्ध करून देण्याबाबत बालभारतीच्या परिपत्रकातील ‘इयत्ता पहिलासाठी ‘खेल खेल में सिखे हिंदी’ (मराठी व इंग्रजी माध्यमांसाठी) या पाठ्यपुस्तकाबाबत सर्व संबंधितांना अलहिदा कळवले जाईल,’ अशा संदिग्ध वाक्यरचनेमुळे राज्यातील अकरावीच्या ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेत संस्थांतर्गत कोट्यातील प्रवेशांसाठीच्या बदललेल्या नियमाला संस्थाचालकांनी विरोध केला आहे. या पार्श्वभूमीवर, ‘संस्थाचालकांचे म्हणणे ऐकून घेऊ, काही बदल आवश्यक असल्यास ते केले जातील,’ असे आश्वासन शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी दिले.

### तरच मुले कोट्यासाठी पात्र ठरणार

शिक्षण विभागाने यंदा राज्यभर राबवल्या जाणाऱ्या अकरावीच्या ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेत इनहाउस कोट्याबाबत महत्त्वपूर्ण बदल केला आहे. त्यानुसार कनिष्ठ महाविद्यालय शाळेच्या संकुलात असेल, तरच मुले इनहाउस कोट्यासाठी पात्र ठरणार आहेत. मात्र, या निर्णयाला संस्थाचालकांनी विरोध केला आहे. त्याबाबत भुसे म्हणाले.

## पादचाऱ्यांना सुरक्षिततेबाबत कोणतीही अडचण येणार नाही

# पिंपरी चिंचवड शहरातील रस्त्यांवर 'अर्बन स्ट्रीटस्केप्स'!

### पादचारी व सायकलस्वारांसाठी रस्ते अधिक सुरक्षित होण्यासाठी प्राधान्य

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने शहरातील प्रमुख रस्ते अधिक सुरक्षित व सर्वसमावेशक बनवण्याच्या दृष्टिने 'अर्बन स्ट्रीटस्केप्स' प्रकल्प हाती घेतला आहे. या अंतर्गत दापोडी, निगडी प्राधिकरणसह शहरातील विविध भागातील रस्ते नागरिकांसाठी सुरक्षित, वाहतुकीच्या सुरळीत संचलनासाठी बनवण्यात येत आहेत. या रस्त्यांवर सलगपणे चालताना पादचाऱ्यांना सुरक्षिततेबाबत कोणतीही अडचण येणार नाही, याला प्राधान्य दिले जात आहे.**




मुंबई-पुणे जुन्या महामार्गावर देखील पादचारी नागरिकांसाठी विनाअडथळा फुटपाथ, स्वतंत्र सायकल ट्रॅक, बसण्यासाठी जागा उपलब्ध करून देण्यासोबत सुरक्षितपणे नागरिकांना रस्ता ओलांडता येईल, यादृष्टिनेही उपाययोजना करण्यात येत आहेत. याच अंतर्गत 'अर्बन स्ट्रीटस्केप्स' हा प्रकल्प राबवताना पथदिवे, चौकांची नव्याने रचना, सेवा वाहिन्या याकडेही विशेष लक्ष दिले जात आहे. ही सर्व कामे 'इंडियन रोड्स काँग्रेस' (आयआरसी) च्या मानकांनुसार केली जात आहेत.

पॅरिस, कोपनहेगन आणि ॲमस्टरडॅम अशा शहरांनी पादचारी आणि सायकलस्वार यांच्यासाठी रस्त्यावर प्रवास सुरक्षित असावा, यासाठी मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक केली आहे. या शहरांप्रमाणेच आता पिंपरी चिंचवड महानगरपालिका पादचारी व सायकलस्वारांसाठी सुरक्षित रस्ते बनवण्यास प्राधान्य देत आहे.

#### पादचारी व सायकलस्वारांचे सर्वेक्षण

'अर्बन स्ट्रीटस्केप्स' या प्रकल्पाचा आराखडा तयार करताना नागरिक, निवासी संस्था, विक्रेते, दुकानदार, वाहतूक पोलीस आदी सर्व घटकांचे आयटीडीपी इंडिया संस्थेने सर्वेक्षण केले. मुंबई-पुणे जुन्या महामार्गावर केलेल्या सर्वेक्षणात ७९ टक्के नागरिकांनी सांगितले की, रस्त्यांची रचना सुधारली गेल्यास सायकल चालवणे व फुटपाथवरून पायी चालण्याचे प्रमाण वाढेल. ८७ टक्के नागरिकांनी रस्त्याची सुरक्षित रचना आणि जागेचे पुनर्वितरण करण्यास पाठिंबा दिला. ८७ टक्के नागरिकांना रस्ता ओलांडताना असुरक्षित वाटत असल्याचे मत व्यक्त केले. ८२ टक्के नागरिकांनी सध्याचा रस्ता मुलांसाठी व ज्येष्ठ नागरिकांना असुरक्षित असल्याचे सांगितले. ७६ टक्के नागरिकांना रात्री प्रवास करताना समस्या जाणवत होत्या तर ५९ टक्के नागरिकांनी अति वेगाने जाणारी वाहने ही मोठी समस्या असल्याचे मत मांडले.

> "पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अंतर्गत येणारे रस्ते केवळ वाहनांसाठी नाही तर पादचारी, सायकलस्वार यासह सर्वांसाठी सुरक्षित असतील, याकडे प्राधान्याने लक्ष देत आहोत. शहरातील रस्ते सुरक्षित करण्याच्या दृष्टिने 'अर्बन स्ट्रीटस्केप्स' प्रकल्प उपयुक्त ठरत आहे. रस्त्यांची कामे करताना सार्वजनिक-खासगी वाहनांसोबतच पादचारी, सायकलस्वार नागरिक यांचाही विचार केला जात आहे.
>
> -शेखर सिंह,
> आयुक्त तथा प्रशासक,
> पिंपरी चिंचवड महापालिका

## नीलेश चव्हाण विरोधात 'लुक आउट' नोटीस

### चव्हाण हा परदेशात पळून जाऊ नये यासाठी बावधन पोलीसांकडून सतर्कता...

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी चिंचवड- वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरणात सहआरोपी असणारा नीलेश चव्हाण याच्या मागावर पिंपरी - चिंचवडसह पुणे पोलीसही आहेत. मात्र, दोन्ही पोलीस दलांना गुंगारा देत चव्हाण मोकाट फिरत आहे. आता चव्हाण हा परदेशात पळून जाऊ नये यासाठी त्याच्या विरोधात पिंपरी - चिंचवड पोलीसांनी 'लुक आऊट' नोटीस काढली आहे.**



नीलेश रामचंद्र चव्हाण (वय ३५, रा. कर्वेनगर) याच्याविरोधात रविवारी (दि. २५) बावधन पोलिसांनी 'लुक आउट' नोटीस जारी केली आहे. वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरणी बावधन पोलिस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्ह्यात शनिवारी (दि. २४) कलम वाढ करून नीलेश चव्हाण यालाही सहआरोपी केले आहे. वैष्णवी यांच्या बाळाची हेळसांड केल्याप्रकरणी हा गुन्हा दाखल झाला आहे. तसेच, वैष्णवी यांच्या मृत्यूनंतर त्यांचे दहा महिन्यांचे बाळ चव्हाण याच्याकडे असताना कस्पटे कुटुंबीय त्याच्याकडे बाळ आणण्यासाठी गेले असता त्यांना नीलेश याने पिस्तूलचा धाक दाखवून धमकाविले होते. त्या प्रकरणातही वारजे माळवाडी पोलिस ठाण्यात नीलेश चव्हाण याच्यावर गुन्हा दाखल आहे. हे गुन्हे दाखल झाल्यापासून नीलेश चव्हाण अद्यापही पसार आहे. दोन्ही पोलीस दलांची पथके त्याच्या मागावर आहेत. ठिकठिकाणी पथके रवाना करण्यात आली आहेत. मात्र, पोलिसांना अद्यापही त्याचा ठावठिकाणा लागू शकलेला नाही.


#### पळून जाण्यात वापरलेली बलेनो मोटार जप्त

वैष्णवी हगवणे हिच्या आत्महत्येनंतर पसार झालेला तिचा सासरा राजेंद्र हगवणे आणि दीर सुशील हगवणे हे पिता-पुत्र बलेनो, थार, इंडेव्हर अशा आलीशान कारमधून फिरल्याचे तसेच, फार्महाऊस, लॉज, शेतावर राहत यथेच्छ पार्ट्याही झोडल्याचे आणि मटणावर ताव मारल्याचेही समोर आले होते. दोघा बाप-लेकांनी लगतच्या तालुक्यांमध्ये ज्या मोटारींमधून प्रवास केला त्यापैकी थार व इंडेव्हर या दोन मोटारी पोलीसांनी शनिवारी (दि. २४) जप्त केल्या. तर तिसरी बलेनो मोटारही रविवारी पोलिसांनी जप्त केली.

### महिला आयोगाने न्याय देण्याची भुमिका स्विकारली नाही हे दुर्दैव : विजय वडेट्टीवार यांची टीका

पिंपरी चिंचवड- वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरण चिघळत असताना दोन-तीन दिवस महिला आयोगाचा त्यात लक्ष घालण्याचा रोल दिसत नव्हता. राजकीय भेद बाजूला ठेवून त्यांनी पुढे यायला पाहिजे होते. या प्रकरणात लक्ष घालून न्याय देण्याची भुमिका स्विकारायला पाहिजे होती. मात्र, दुर्दैवाने ती आम्हाला दिसली नाही. हे राज्याचे, महिलांचे दुर्दैव आहे, अशी टीका काँग्रेसचे विधीमंडळ गटनेते विजय वडेट्टीवार यांनी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांच्यावर केली. वाकड येथे वैष्णवी हिच्या कुटूंबियांची विजय वडैट्टीवार यांनी रविवारी (दि. २५) भेट घेतली आणि सांत्वन केले. त्यानंतर पत्रकारांशी बोलताना वडेट्टीवार म्हणाले, महिलांवर अत्याचाराच्या प्रमाणात महाराष्ट्र सगळ्या राज्यांच्या पुढे गेला आहे. महिलांच्या, मुलींच्या सुरक्षेच्या संदर्भात मागील पाच वर्षात ६६ हजार महिला बेपत्ता आहेत. दर दोन तास तेरा मिनिटांमध्ये एका महिलेचा खून होतो किवा तिच्यावर अत्याचार होतो. ही सगळी परिस्थिती बघता राज्यात कायद्याचा जो धाक असला पाहिजे, तो दिसत नाही. पोलीस असे का वागत आहेत. पोलीसांचा धाक का दिसत नाही. कायद्याचा बडगा कठोरपणे का उगारला जात नाही. महाराष्ट्र अधोगतीला चालल्याचे हे निदर्शन आहे. राज्याच्या महिला आयोगाला पूर्ण वेळ दिला पाहिजे.

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने »



### आनंद मिळविण्यासाठी वासना भगवंताकडे वळवावी.

घरामध्ये सर्वांनी कसे हसूनखेळून मजेत असावे. आपली वृत्ती अशी असावी की, ज्याला आनंद पाहिजे असेल त्याने आपल्याकडे धाव घ्यावी. इतर संपत्ति कितीही दिली तरी पुरे पडत नाही, पण वृत्तीचा आनंद देऊन कधी संपत नाही. जीवन हे मूलत: आनंदमय आहे; सृष्टिक्रमावर सोडले तर ते सुखी होईल. आनंद अत्यंत विशाल आहे. देहबुद्धि मेली म्हणजेच त्याची प्राप्ती होत असते. आनंद मिळविणे हे सोपे आहे; पण हे समजून, आपण सोपे झाले पाहिजे. आपण उपाधीने जड झालो आहोत, म्हणून आपण हलके झाले पाहिजे. सर्व जगाला आनंद हवा असतो. म्हणून कोणत्याही परिस्थितीत आनंद राखावा. आनंद हा शाश्वत आहे. पण आपण विषयातच आनंद मानतो, त्यामुळे खरा शाश्वत आनंद आपल्याला मिळत नाही. फोड आला म्हणजे खाज सुटते आणि खाजवल्यावर रक्त आले तरी एक प्रकारचा आनंद आपल्याला होत असतो; पण म्हणून, खाजवतच राहणे योग्य होईल का ? कुत्र्याच्या तोंडात हाड असताना, स्वत:च्या तोंडातले रक्तच तो चघळत असतो. त्यातले काही रक्त जमिनीवर पडून कमीही होत असते. परंतु तो हाडूक काही सोडीत नाही. विषयाचा आनंद हा असाच असतो. कोणतीही वस्तू अस्तित्वात नसतानाही होणारा जो आनंद, ते परमात्म्याचे व्यक्त स्वरूप आहे. वासना भगवंताकडे वळविली की मग आनंदाशिवाय दुसरा कोणता लाभ होणार ? खरोखर, वासना ही विस्तवासारखी आहे. ज्या विस्तवाने सुंदर स्वयंपाक करून कढत आणि ताजे अन्न खायला मिळते, तोच विस्तव जर घरावर ठेवला, तर घर जाळून टाकतो. त्याप्रमाणे, वासना भगवंताकडे वळली तर माणसाला आनंदरूप बनविते; पण ती जर विषयाकडे वळली तर त्याला दु:खामध्ये लोटते. वासना रोज नवीन नवीन खेळ आपल्याला दाखविते; म्हणजे, खेळ जुनेच असतात, पण आपली वासना मात्र नवी असते. वासना, म्हणजे अभिमान किंवा मीपणा, हा मनुष्याचा शत्रू असून तो त्याच्या आनंदावर विरजण घालतो. वासनेमुळे चित्ताला समाधान नाही हे कळत असूनसुद्धा, वासनेचा जोर इतका विलक्षण असतो की, तो शेवटच्या श्वासापर्यंत जात नाही. ज्याने वासनेला जिंकले, त्याच्यावर भगवंताची कृपा झाली म्हणून समजावे. वासनेला जिंकायला भगवंताच्या नामात राहण्यासारखा दुसरा उपाय नाही. वासना न ठेवता कर्म करणे याचेच नाव संन्यास. जिथे वासना संपली तिथे आनंदच आहे.

**बोधवचन:- चिरकाल टिकणारा आनंद हा वस्तुरहित असतो.**



## 'स्टेट'मेंट

अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

**कोणतीही निवडणूक आली, की उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे एकत्र येणार, अशा चर्चांना अक्षरशः उधाण येते. प्रत्यक्षात, दोघे एकत्र येऊन चर्चा करत नाहीत, ही खरी डोकेदुखी आहे. दोघांनी एकत्र येण्याच्या चर्चा एकीकडून संजय राऊत आणि दुसरीकडून संदीप देशपांडे करताना दिसतात. अर्थात, प्रत्यक्ष सकारात्मक न बोलता दोघेही फक्त एकमेकांच्या कागाळ्या काढण्यात पटाईत आहेत, तो भाग वेगळा !**

# दोन्ही ठाकरे बंधूंचे जमेना, एकमेकांवाचून करमेना !



### मुंबई महापालिका डोळ्यासमोर..!

सर्वच राजकीय पक्षांच्या दृष्टीने डोळ्यासमोर आहे ती मुंबई महानगरपालिकेची निवडणूक ! ही महानगरपालिका हातात असली म्हणजे बाकी काहीही नको, अशी एक अटकळ खेळली जाते. अनेक राज्यांपेक्षा मुंबई महानगरपालिकेचे बजेट जास्त आहे, भरपूर काम करायला वाव आहे आणि इतर उचापतींसाठी मोठा 'स्कोप' देखील आहे हे सर्वांना माहीत आहे.

### मुंबईसाठी काय पण..

मुंबईमध्ये निवडणूक जिंकणे सोपे आहे, असे ठाकरे घराण्याला वाटते. त्याचे कारण पूर्वी वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांनी आदेश द्यायचा आणि मुंबईकरांनी म्हणजेच पर्यायाने मराठी माणसाने धपाधपा मते टाकायची, हे समीकरण होते. तोच कित्ता पुन्हा गिरवण्यासाठी दोन्ही ठाकरे बंधू एकत्र येण्याशिवाय पर्याय नाही, हे जाणकारांना वाटते आणि म्हणून त्यांचेही प्रयत्न सुरू असावेत.

### पुलाखालून बरेच पाणी गेले..

राजकारणाच्या मधल्या काळात पुलाखालून बरेच पाणी गेलेले आहे. शिवसेनेचे तुकडे झाले असून छोटा तुकडा उद्धव ठाकरे यांच्याकडे आहे. मोठा तुकडा भारतीय जनता पार्टीला जाऊन मिळाला आहे. याच काळात राज ठाकरे यांचे राजकीय वजन पूर्णपणे संपल्यात जमा आहे. राजकारणामध्ये 'महायुती' चे तिन्ही पक्ष मोठ्या ताकतीने आपले अस्तित्व टिकवून आहेत, तर 'महाआघाडी' तील तीनही पक्ष अस्तित्व संपण्याच्या मार्गावर आहेत की काय, अशी त्यांची वाटचाल आहे !

### राज ठाकरे यांचे नक्की काय ?

महा नवनिर्माण सेनेचे राज ठाकरे हे प्रत्येक निवडणुकीत आपली भूमिका बदलण्यात तरबेज आहेत. आपल्या भाषणांनी त्यांनी अनेकांना दुखावले आहे. त्यामध्ये उद्धव ठाकरे, देवेंद्र फडणवीस, शरद पवार यांनाही त्यांनी वेळोवेळी सुनावले आहे. भाजपला विरोध, पण मोदींना पाठिंबा, जातीयवादी राष्ट्रवादी काँग्रेसला विरोध पण अजित, शरद पवारांना पाठिंबा अशा काहीतरी कोलांटउड्या ते नेहमी घेत असतात, हे देखील आता लपून राहिले नाही.

### दोन्ही ठाकरेंची विश्वासार्हता ?

आता मूळ मुद्द्याचा प्रश्न असा आहे की उद्धव आणि राज या दोन्ही भावांची विश्वासार्हता काय? हा प्रश्न जनता विचारत आहे. दरवेळी बदलणारी भूमिका हे राज ठाकरे यांचे वैशिष्ट्य आहे. तर भाजपा बरोबर निवडणूक लढवून ज्यांच्या विरोधात निवडणूक लढवली, त्या दोन्ही काँग्रेसच्या मांडीवर बसण्याचा प्रसंग उद्धव ठाकरे यांना आयुष्यभर भोवणार आहे. थोडक्यात, दोघांच्या विश्वासार्हतेवरच प्रश्नचिन्ह आहे.

### 'मनसे' बरोबर युतीसाठी 'दिलसे' तयार..

उद्धव गट आणि मनसे युतीच्या चर्चा पुन्हा एकदा सुरु झाल्या तेव्हापासून आपला गट मनसेसोबत युती करायला पूर्णपणे सकारात्मक आहे, असे उबाठा गटाचे प्रवक्ते संजय राऊत सांगत आहेत. मराठी माणसासाठी मनसे सोबत एक पाऊल पुढे टाकायला दिलसे तयार असल्याचे ठाकरेंच्या गटाकडून सांगण्यात येत आहे. मात्र, दुधा ने दोनदा तोंड पोळलेली मनसे ताकसुद्धा फुंकून पिताना दिसत आहे. उद्धव ठाकरेंसोबत कोणतीही चर्चा सुरु नसल्याचे मनसेकडून सांगण्यात आले आहे. पुन्हा थोडक्यात सांगायचे झाले तर 'बाजारात तुरी...'

### टाळी देण्यासाठी मुहूर्त कोणता?

ठाकरे बंधू तयार आहेत, पण टाळी देण्या-घेण्यासाठी टायमिंग जुळणार का? संजय राऊतांचे नेहमीचे तिरकस बोलणे ऐकले की असे अनेक प्रश्न पडल्याशिवाय राहात नाहीत, हा एक वेगळाच भाग आहे. दोन्ही ठाकरेंचे पक्ष स्वतःला मराठी माणसाचा उद्धार करणारे पक्ष समजतात. मराठी माणसासाठी सर्वकाही बाजूला ठेवून एकत्र यावे लागेल, ही उद्धव ठाकरे यांची भूमिका असल्याचे संजय राऊत अनेकदा सांगून गेले आहेत. त्यांनी स्पष्ट सांगितले आहे, की उद्धव ठाकरे यांच्यासोबत आमच्या सगळ्यांची चर्चा झाली. मनसे संदर्भात सकारात्मक पाऊल टाकायला हरकत नाही, असे त्यांचे म्हणणे आहे. त्यांनी मनसे दिलसे ही भूमिका घेतली आहे. उद्धव ठाकरे, सर्व पक्ष, आम्ही सगळे राज ठाकरे यांच्यासोबत नाते जोडायला पूर्णपणे सकारात्मक आहोत. महाराष्ट्राच्या जनतेचे दोघांवरती भावनिक आणि राजकीय प्रेशर आहे, असे दोन्ही ठाकरेंनाही वाटते.

### ठाकरे ब्रँड संपणार नाही...

राज ठाकरे स्पष्ट बोलतात, पण उद्धव ठाकरे यांचे बोलणे नेहमीच संभ्रमात टाकणारे असते. त्यामुळे दोघे केव्हा? कधी? आणि कुठे? एकत्र येणार, हे मात्र समजण्यापलीकडची गोष्ट झाली आहे. दोन्ही ठाकरे एकत्र येणार याची चर्चा सुरू झाली. मात्र, याचा पुढचा अध्याय सुरु व्हायच्या आतच ठाकरे बंधू परदेश दौऱ्यावर गेले. मायदेशी परत आल्यानंतर सुद्धा युती च्या चर्चेची गाडी काही पुढे गेलीच नाही आणि या चर्चांना पूर्णविराम मिळाला. एप्रिलमध्ये दिलेल्या मुलाखतीचा वेगळा अर्थ काढला गेला, अशी सारवासारव राज ठाकरे यांनी एका मुलाखतीमध्ये केली. त्यामुळे आधीच्या गोंधळामध्ये आणखी भरच पडली. ठाकरे ब्रँड संपवायला सुद्धा काहीजण निघाले आहेत, मात्र तो ब्रँड संपणार नाही, असा राज ठाकरे यांनी दिलेला इशारा कोणासाठी होता, हे सुद्धा समजू शकले नाही.

### नवीन नाती जोडायची का तोडायची ?

संजय राऊत हे सकारात्मक बोलत आहेत, पण मनसेकडून मात्र तसा प्रतिसाद मिळत नाही. पडद्यामागे ना पडद्यापुढे.. आमची कुठलीही सध्या बोलणी चालू नाहीत. आम्हाला कुठलेही पत्र आले नाही. ठाकरे गटाकडून कुठले ही अधिकृत असे बोलावणे नाही. या आधी जेव्हा आम्हाला युती करायची होती, तेव्हा आम्ही एक रितसर माणूस पाठवला होता. यांना नवी नाती जोडायची, की दुसरी असलेली नाती तोडायची आहेत ? असा प्रश्न मनसेकडून उपस्थित करण्यात आला आहे.

### शंका कुशंकांनी भरलेली मनसे..

यापूर्वीचा, अनुभव पाहता उद्धव ठाकरे आपल्याला शेवटपर्यंत झुलवत ठेवतील, अशी शंका मनसेला वाटते. तसे झाले तर ना महायुती, ना मविआ अशी त्रिशंकू स्थिती होईल, अशी भीती मनसेला सतावत असेल,तर ते पूर्णपणे चुकीचे नक्कीच नाही. उबाठा आणि मनसेच्या युती संदर्भात एकीकडे मनसेकडून तसा सावध पवित्रा घेतला जात असताना किंवा कुठल्याही प्रकारे स्पष्ट भूमिका मांडली जात नसताना ठाकरेंच्या गटाकडून मात्र पूर्णपणे सकारात्मक भूमिका 'युती' संदर्भात मांडली गेली आहे. सध्या मुंबई महापालिकेच्या आणि इतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांना अवकाश आहे. त्यामुळे या नुसत्या चर्चेनंतर प्रत्यक्षात काही घडामोडी घडतात का? यावर राज्यातील राजकारण अवलंबून असणार आहे.

### मनसेचा ओढा 'महायुती' कडे?

उद्धव ठाकरे यांची एकूण विश्वासार्हता आणि राजकीय भूमिका पाहता महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा ओढा महायुतीकडे आहे हे वेळोवेळी सिद्ध होत आहे. देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांच्या किंवा त्यांच्या कार्यकर्त्यांच्या राज ठाकरे यांच्याबरोबर होणाऱ्या गाठीभेटी आणि चर्चा कशासाठी? याचे उत्तर लवकरच मिळणार आहे. पण, सध्याच्या परिस्थितीत दोन्ही ठाकरे बंधू एकत्र येतील, असे वाटत नाही.. मराठी माणसाला पण.. आणि त्या दोघांना पण!

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# रामदास आठवले महायुतीवर नाराज?

## माझ्या पक्षाचा एकही खासदार किंवा आमदार नाही



। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आरपीआय) पक्षाचे अध्यक्ष तथा केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी महाराष्ट्रातील महायुतीवर नाराजी व्यक्त केली आहे. खरं तर या आधीही रामदास आठवले यांनी नाराजी व्यक्त केली होती. लोकसभा निवडणुकीत आरपीआयने दोन जागा मागितल्या होत्या. मात्र, त्यांना त्या मिळाल्या नाहीत. विधानसभेच्या निवडणुकीतही आरपीआयला एक देखील जागा मिळाली नाही. त्यानंतर विधानपरिषदेमध्येही एकही जागा त्यांच्या पक्षाला मिळाली नाही, त्यामुळे रामदास आठवले यांनी नाराजी व्यक्त केली होती.**

त्यानंतर आता पुन्हा एकदा रामदास आठवले यांनी महायुतीवर नाराजी बोलून दाखवत खंत व्यक्त केली आहे. महायुती सरकारमध्ये आरपीआयला एकही मंत्रिपद न मिळाल्यामुळे त्यांनी ही नाराजी व्यक्त केली आहे. तसेच आता महायुतीच्या काळात आमच्या पक्षाला सत्ता मिळत नाही. मात्र, शरद पवारांच्या काळात काँग्रेसच्या आघाडीबरोबर असताना आमच्या पक्षाला सत्ता मिळायची असं म्हणत महायुतीमध्ये आमच्यावर अन्याय होत असल्याचं रामदास आठवले यांनी आज माध्यमांशी बोलताना म्हटलं आहे.आज आमची अडचण अशी आहे की आता मला एक मंत्रिपद मिळालेलं आहे. पण माझ्या पक्षाचा एकही खासदार किंवा आमदार नाही. तरीही माझ्या पक्षाची जी काही छोटी-मोठी ताकद आहे, हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना माहिती आहे. त्यामुळे मला तीन वेळा त्यांनी मंत्रिमंडळात घेतलं. मात्र, आमच्या पक्षातील बाकीच्या लोकांना काही मिळत नाही. दिल्लीतही काही पद मिळत नाही आणि महाराष्ट्रात नाही", असं रामदास आठवले यांनी म्हटलं आहे.आम्हाला एखादे महामंडळ किंवा मंत्रिपद मिळायला हवं होतं. देवेंद्र फडणवीस यांच्याबरोबर अनेकदा चर्चा झाली. मात्र, देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या पक्षासाठी अनेकदा विधानपरिषदेसाठी नावे जाहीर केली. पण आमच्या पक्षाला विधानपरिषदेची एक जागाही दिली नाही. विधानसभेला एकही जागा दिली नाही, तर विधानपरिषदेची तरी एक जागा द्यायला हवी होती, तसेच आमच्या पक्षाचा एक मंत्री देखील करायला हवा होता", असं रामदास आठवले म्हणाले आहेत. आमच्यावर अन्याय होतोय ही खरी गोष्ट आहे. मला एकट्याला मंत्रिपद मिळालं असलं तरी माझ्या कार्यकर्त्यांना देखील सत्तेचा सहभाग मिळायला हवा. शरद पवारांच्या काळात काँग्रेसच्या आघाडी बरोबर असताना आमचे ६ ते ७ जण विधानपरिषदेवर होते, ३ ते ४ मंत्री देखील झाले होते. त्यामध्ये मी मंत्री झालो, शेगावकर मंत्री झाले होते, दयानंद म्हस्के मंत्री झाले होते, मुंबईत आमचा महापौर झाला होता. पुण्यात देखील आमचा उपमहापौर झाला होता. त्या काळात (आघाडीच्या) आम्हाला अनेक ठिकाणी सत्ता मिळाली. मात्र, आता महायुतीच्या काळात आरपीआयला सत्ता मिळत नाही अशी परिस्थिती आहे", अशी खंत रामदास आठवले यांनी बोलून दाखवली आहे. आता पुन्हा एकदा रामदास आठवले यांनी महायुतीवर नाराजी बोलून दाखवत खंत व्यक्त केली आहे. महायुती सरकारमध्ये आरपीआयला एकही मंत्रिपद न मिळाल्यामुळे त्यांनी ही नाराजी व्यक्त केली आहे.

### पक्षातील लोकांना काही मिळत नाही

तसेच आता महायुतीच्या काळात आमच्या पक्षाला सत्ता मिळत नाही. मात्र, शरद पवारांच्या काळात काँग्रेसच्या आघाडीबरोबर असताना आमच्या पक्षाला सत्ता मिळायची असं म्हणत महायुतीमध्ये आमच्यावर अन्याय होत असल्याचं रामदास आठवले यांनी आज माध्यमांशी बोलताना म्हटलं आहे.आज आमची अडचण अशी आहे की आता मला एक मंत्रिपद मिळालेलं आहे. पण माझ्या पक्षाचा एकही खासदार किंवा आमदार नाही. तरीही माझ्या पक्षाची जी काही छोटी-मोठी ताकद आहे, हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना माहिती आहे. त्यामुळे मला तीन वेळा त्यांनी मंत्रिमंडळात घेतलं. मात्र, आमच्या पक्षातील बाकीच्या लोकांना काही मिळत नाही. दिल्लीतही काही पद मिळत नाही आणि महाराष्ट्रात नाही", असं रामदास आठवले यांनी म्हटलं आहे.

# मान्सूनपूर्व सरींमुळे धबधबे किंचितसे प्रवाहित!

## पर्यटन हंगामाला लवकरच सुरुवात होण्याची शक्यता



। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**महाराष्ट्राचे 'प्रति महाबळेश्वर' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आंबोलीमध्ये मान्सूनपूर्व पावसाने हजेरी लावल्यामुळे येथील प्रसिद्ध धबधबे आतापासूनच किंचित प्रवाहित होऊ लागले आहेत. यामुळे लवकरच पर्यटन हंगाम सुरू होण्याची चिन्हे असून, स्थानिक व्यावसायिकांना मोठा आर्थिक फायदा होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. मात्र, या साऱ्याची भिस्त पूर्णपणे पावसावर अवलंबून आहे.**

आंबोली, गेळे आणि चौकुळ ही तिन्ही गावे त्यांच्या नयनरम्य निसर्ग सौंदर्यासाठी, घनदाट धुक्यासाठी, फेसाळणाऱ्या धबधब्यांसाठी आणि विपुल जैवविविधतेसाठी प्रसिद्ध आहेत. महाराष्ट्र, गोवा आणि कर्नाटकसह देशभरातून मोठ्या संख्येने पर्यटक आंबोलीचा पाऊस, धुके आणि निसर्गाचा मनमुराद आनंद लुटण्यासाठी येत असतात. थंड हवेच्या या ठिकाणी पर्यटकांची नेहमीच रेलचेल असते.आंबोली घाटातील प्रसिद्ध धबधबे, नांगरतास धबधबा,हिरण्यकेशी नदीचा उगम आणि आध्यात्मिक पर्यटन स्थळ, महादेव गड पॉईंट, वनबाग, फुलपाखरू उद्यान यांसारखी विविध पर्यटन स्थळे पर्यटकांना खुणावत आहेत. याव्यतिरिक्त गेळे येथील कावळेसाद पॉईंट आणि चौकुळमधील विविध पर्यटन स्थळे देखील पर्यटकांना आकर्षित करतात. स्थानिक व्यावसायिकांनी पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी आपापल्या परीने तयारी सुरू केली आहे.पर्यटकांची वाढती संख्या लक्षात घेता, आमदार दीपक केसरकर यांच्या पुढाकाराने वन विभागाने पर्यटकांना पर्यटन स्थळांची सैर घडवण्यासाठी दोन वाहने सज्ज ठेवली आहेत. ही वाहने वन व्यवस्थापन समितीच्या ताब्यात देण्यात आली आहेत, ज्यामुळे पर्यटकांना आंबोली परिसरातील निसर्गाचा अधिक चांगल्या प्रकारे अनुभव घेता येईल. हवामान खात्याने लवकरच मान्सून दाखल होण्याची माहिती दिली असल्याने, आंबोलीतील धबधबे लवकरच पूर्ण क्षमतेने प्रवाहित होतील अशी आशा आहे.

### वन विभागाचा पुढाकार

सध्याही आंबोलीमध्ये दाट धुके आणि पावसाचा अनुभव घेता येत असून, घाटात धुक्याची चादर पाहण्याची संधी पर्यटकांना मिळत आहे. त्यामुळे येत्या काही दिवसांत आंबोलीमध्ये पर्यटकांची गर्दी वाढण्याची शक्यता आहे. आंबोली घाट आणि घाटातील नागमोडी वळणे पादाक्रांत करताना अनोळखी पर्यटक बेधुंद होऊन जातात. शाळांना सुट्टी लागली आहे तसेच आज रविवार असल्याने पर्यटकांनी गर्दी केली होती.महाराष्ट्राचे 'प्रति महाबळेश्वर' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आंबोलीमध्ये मान्सूनपूर्व पावसाने हजेरी लावल्यामुळे येथील प्रसिद्ध धबधबे आतापासूनच किंचित प्रवाहित होऊ लागले आहेत. यामुळे लवकरच पर्यटन हंगाम सुरू होण्याची चिन्हे असून, स्थानिक व्यावसायिकांना मोठा आर्थिक फायदा होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. मात्र, या साऱ्याची भिस्त पूर्णपणे पावसावर अवलंबून आहे.

# पाकिस्तानला किंमत मोजावी लागेल!

## भारतीय शिष्टमंडळाकडून अमेरिकेत पाकिस्तानचा पर्दाफाश

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**पाकिस्तानचा पर्दाफाश करण्यासाठी, त्यांचा दहशतवादी अजेंडा जगासमोर आणण्यासाठी भारतीय खासदार व अधिकाऱ्यांची शिष्टमंडळं जगभरातील वेगवेगळ्या देशांच्या दौऱ्यावर गेली आहेत. काँग्रेस खासदार शशी थरूर यांच्या नेतृत्वाखालील सर्वपक्षीय खासदारांचं शिष्टमंडळ अमेरिकेच्या दौऱ्यावर गेलं आहे. यावेळी शशी थरूर म्हणाले, “पाकिस्तान सातत्याने भारतविरोधी कुरापती करतोय, भारतात दहशदवादी हल्ले घडवून आणतोय. मात्र, आता त्यांना त्याची किंमत मोजावी लागेल. कारण, इस्लामाबाद दहशतवादाशी लढण्याबाबत गांभीर्य दाखवत नाहीये”**



शशी थरूर यांनी न्यूयॉर्कमधील भारताच्या वाणिज्य दूतावासात अमेरिकेतील थिंक टँक व प्रसारमाध्यमांशी बातचीत केली. यावेळी त्यांनी पाकिस्तानचा निषेध नोंदवला. ते म्हणाले, “पाकिस्तान भारताची जमीन बळकावण्यासाठी सातत्याने दहशतवादाचा वापर करत आला आहे. २२ एप्रिल रोजी पहलगाममध्ये झालेल्या हल्ल्याचं प्रमुख उद्दीष्ट म्हणजे जम्मू-काश्मीरची शांतता बिघडवणे, तिथे तणाव निर्माण करणे आणि भारतात हिंसाचार करणे हे होतं. त्या दहशतवाद्यांनी हिंदू नागरिकांना गोळ्या घातल्या.

केंद्र सरकारने सर्वपक्षीय खासदार व माजी सनदी अधिकाऱ्यांची सात शिष्टमंडळं तयार केली असून जगभरातील वेगवेगळ्या देशांमध्ये पाठवण्यात आली आहेत. थरूर यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळ हे त्यापैकीच एक आहे. या शिष्टमंडळाने भारतीय लष्कराच्या ‘ऑपरेशन सिंदूर” या मोहिमेची न्यूयॉर्कमध्ये माहिती दिली. दहशतवादाला तोंड देताना अशा प्रकारची मोहीम किती महत्त्वाची आहे हे या शिष्टमंडळाने सांगितलं. काँग्रेस खासदार शशी थरूर यावेळी म्हणाले, “पाकिस्तानात बसलेला कोणीही भारतीय नागरिकांवर हल्ला करू शकत नाही. त्यांनी तसं केल्यास त्यांना त्याची मोठी किंमत मोजावी लागेल. पाकिस्तान पुरस्कृत दहशतवाद्यांनी यापूर्वी पूलवामा येथे हल्ला केला. त्यानंतर भारताने प्रत्यक्ष नियंत्रण रेषा (एलओसी) ओलांडून पाकिस्तानमध्ये सर्जिकल स्ट्राइक करून त्यांना जोरदार प्रत्युत्तर दिलं. तिथल्या दहशतवादी छावण्या उद्ध्वस्त केल्या. यावेळी (ऑपरेशन सिंदूर) भारताने केवळ प्रत्यक्ष नियंत्रण रेषाच नव्हे तर आंतरराष्ट्रीय सेमा देखील ओलांडली आणि पाकिस्तानमध्ये त्यांच्या घरात घुसून हल्ला केला. आम्ही केवळ दहशतवाद्यांना लक्ष्य केलं. आम्हाला पाकिस्तानबरोबर युद्ध करणात काडीमात्र रस नाही. आम्ही केवळ दहशतवादाशी दोन हात करत आहोत.

शशी थरूर यांनी न्यूयॉर्कमधील भारताच्या वाणिज्य दूतावासात अमेरिकेतील थिंक टँक व प्रसारमाध्यमांशी बातचीत केली. यावेळी त्यांनी पाकिस्तानचा निषेध नोंदवला. ते म्हणाले, “पाकिस्तान भारताची जमीन बळकावण्यासाठी सातत्याने दहशतवादाचा वापर करत आला आहे. २२ एप्रिल रोजी पहलगाममध्ये झालेल्या हल्ल्याचं प्रमुख उद्दीष्ट म्हणजे जम्मू-काश्मीरची शांतता बिघडवणे, तिथे तणाव निर्माण करणे आणि भारतात हिंसाचार करणे हे होतं. त्या दहशतवाद्यांनी हिंदू नागरिकांना गोळ्या घातल्या. केंद्र सरकारने सर्वपक्षीय खासदार व माजी सनदी अधिकाऱ्यांची सात शिष्टमंडळं तयार केली असून जगभरातील वेगवेगळ्या देशांमध्ये पाठवण्यात आली आहेत. थरूर यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळ हे त्यापैकीच एक आहे.

### दहशतवादी छावण्या उद्ध्वस्त केल्या


या शिष्टमंडळाने भारतीय लष्कराच्या ‘ऑपरेशन सिंदूर” या मोहिमेची न्यूयॉर्कमध्ये माहिती दिली. दहशतवादाला तोंड देताना अशा प्रकारची मोहीम किती महत्त्वाची आहे हे या शिष्टमंडळाने सांगितलं. काँग्रेस खासदार शशी थरूर यावेळी म्हणाले, “पाकिस्तानात बसलेला कोणीही भारतीय नागरिकांवर हल्ला करू शकत नाही. त्यांनी तसं केल्यास त्यांना त्याची मोठी किंमत मोजावी लागेल. पाकिस्तान पुरस्कृत दहशतवाद्यांनी यापूर्वी पूलवामा येथे हल्ला केला. त्यानंतर भारताने प्रत्यक्ष नियंत्रण रेषा (एलओसी) ओलांडून पाकिस्तानमध्ये सर्जिकल स्ट्राइक करून त्यांना जोरदार प्रत्युत्तर दिलं. तिथल्या दहशतवादी छावण्या उद्ध्वस्त केल्या.

# पाकिस्तान भारताकडे धोका म्हणून पाहतो!

## अमेरिकन गुप्तचर विभागाच्या अहवालात धक्कादायक खुलासा

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**जम्मू-काश्मीरच्या पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्याला आता एक महिना पूर्ण होऊन गेला आहे. २२ एप्रिल रोजी पहलगाममध्ये दहशतवादी हल्ला झाला होता. या हल्ल्यात तब्बल २६ पर्यटकांचा मृत्यू झाला होता. या घटनेनंतर संपूर्ण देशात संतप्त प्रतिक्रिया उमटल्या होत्या. त्यानंतर भारताने ६ आणि ७ मे रोजी रात्री ऑपरेशन सिंदूर राबवत पाकिस्तानला जोरदार प्रत्युत्तर दिलं. भारताने ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील ९ दहशतवादी तळांना उद्ध्वस्त केलं.**





तसेच त्यानंतर पाकिस्तानने भारताच्या सीमेवर केलेल्या ड्रोन हल्ल्याला देखील जशास तसं प्रत्युत्तर दिलं. मात्र, दोन्ही देशातील तणाव मोठ्या प्रमाणात वाढल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमध्ये शस्त्रसंधी झाली आणि दोन्ही देशातील तणाव काहीसा कमी झाल्याची परिस्थिती सध्या आहे. असं असलं तरी अद्यापही ऑपरेशन सिंदूरची चर्चा जगभरात सुरु आहे. दरम्यान, अशातच आता भारत आणि पाकिस्तानमधील तणावाच्या पार्श्वभूमीवरील अमेरिकेच्या संरक्षण विभागाने (डिफेन्स इंटेलिजन्स एजन्सी) सादर केलेल्या एका जागतिक धोका मूल्यांकन अहवालातून मोठी माहिती समोर आली आहे.अमेरिकेच्या संरक्षण गुप्तचर संस्थेने रविवारी जागतिक धोका मूल्यांकन हा अहवाल प्रसिद्ध केला. या अहवालानुसार, पाकिस्तान चीनच्या लष्करी आणि आर्थिक पाठिंब्याने आपल्या अण्वस्त्रांचे आधुनिकीकरण करत आहे. तसेच पाकिस्तान भारताकडे अस्तित्वाचा धोका म्हणून पाहतो. तसेच येत्या वर्षासाठी पाकिस्तानी लष्कराच्या सर्वोच्च प्राधान्यांमध्ये प्रादेशिक शेजाऱ्यांबरोबर सीमापार चकमकी आणि त्यांच्या अण्वस्त्र शस्त्रागारांचे सतत आधुनिकीकरण यासह इतर उद्दिष्टांचा समावेश असण्याची शक्यता असल्याचं अहवालात म्हटलं आहे. या संदर्भातील वृत्त टाइम्स ऑफ इंडियाने दिलं आहे.

### ऑपरेशन सिंदूरची चर्चा जगभरात सुरु

तसेच पाकिस्तान आपल्या अण्वस्त्रांचे आधुनिकीकरण करण्याचे प्रयत्न करत असून अण्वस्त्र सामग्रीची आणि अण्वस्त्र नियंत्रणाची सुरक्षा राखत आहे. पाकिस्तान जवळजवळ काही परदेशी पुरवठादार आणि मध्यस्थांकडून डब्लूएमडी लागू असलेल्या वस्तू खरेदी करतो, असंही अहवालात म्हटलं. तसेच असंही अधोरेखित करण्यात आलं की, पाकिस्तान चीनकडून सामूहिक विनाशकारी शस्त्रे विकसित करण्यासाठी साहित्य आणि तंत्रज्ञान मिळवत आहे. यापैकी काही हस्तांतरण हाँगकाँग, सिंगापूर, तुर्की आणि संयुक्त अरब अमिराती सारख्या देशांमधून होण्याची शक्यता आहे.दरम्यान, पाकिस्तानला प्रामुख्याने चीनच्या आर्थिक आणि लष्करी उदारतेचा लाभ होतो.

## अल्लू अर्जुन -क्रिती बेस्ट ॲक्टर

69 व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांच्या विजेत्यांची घोषणा गुरुवारी सायंकाळी 5 वाजता करण्यात आली. मराठामोळा दिग्दर्शक निखिल महाजनला गोदावरी या चित्रपटासाठी सर्वोत्कृष्ट दिग्दर्शकाचा पुरस्कार मिळाला आहे. तर अल्लू अर्जुनला पुष्पा या चित्रपटासाठी सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार मिळाला, तर आलिया भट्ट आणि क्रिती सेनन यांना अनुक्रमे गंगूबाई काठियावाडी आणि मिमी या चित्रपटासाठी सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार विभागून मिळाला. रॉकेट्री: द नंबी इफेक्टला सर्वोत्कृष्ट फीचर फिल्मचा पुरस्कार मिळाला. सरदार उधम हा सर्वोत्कृष्ट हिंदी चित्रपट ठरला आहे, तर एकदा काय झाले हा सर्वोत्कृष्ट मराठी चित्रपट ठरला आहे. अभिनेत्री पल्लवी जोशीला द काश्मीर फाइल्ससाठी तर पंकज त्रिपाठीला मिमीसाठी सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेत्याचा पुरस्कार मिळाला आहे.राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार हे सर्वात प्रतिष्ठित पुरस्कार आहेत, जे देशभरातील सर्वोत्कृष्ट चित्रपट निर्मिती प्रतिभेचा सन्मान करण्यासाठी दरवर्षी जाहीर केले जातात. हे पुरस्कार पहिल्यांदा 1954 मध्ये देण्यात आले आणि ते 'स्टेट पुरस्कार' म्हणून ओळखले जायचे. त्यावेळी विविध प्रादेशिक भाषांमधील सर्वोत्कृष्ट चित्रपटांनाच मान्यता आणि पुरस्कार दिले जात होते. चित्रपटांवर काम करणारे अभिनेते आणि तंत्रज्ञ यांना प्रथम पुरस्कार 1967 मध्ये देण्यात आला. नर्गिस ही 'रात और दिन' मधील अभिनयासाठी सर्वोत्कृष्ट अभिनेत्री जिंकणारी पहिली अभिनेत्री होती.



## प्रीती झिंटाची कौतुकास्पद कामगिरी

बॉलीवूड अभिनेत्री प्रीती झिंटानं आजवर आपल्या सौंदर्याने आणि अभिनयाने प्रेक्षकांचं मनोरंजन केलं आहे. आजवर अनेक चित्रपटांमधून प्रेक्षकांच्या भेटीला आलेली अभिनेत्री सोशल मीडियाच्या माध्यमातून चाहत्यांच्या संपर्कात राहत असते. बॉलीवूड विश्वापासून ती सध्या दूर असली, तरी आयपीएल सामन्यांच्या निमित्तानं प्रीतीच्या नावाची चर्चा होताना दिसते. अशातच आता प्रीतीने केलेल्या एका कौतुकास्पद कामगिरीमुळे ती पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. भारतीय सैनिकांच्या विधवा पत्नी व मुलांच्या भविष्यातील कल्याणासाठी प्रीतीनं आर्थिक मदत म्हणून ₹१.१० कोटी देणगी दिली आहे. प्रीतीनं ही देणगी दक्षिण-पश्चिम कमांडच्या 'आर्मी वाइव्ज वेल्फेअर असोसिएशन'ला (AWWA) दिली आहे. ही देणगी आयपीएल संघ पंजाब किंग्जच्या कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (CSR) अंतर्गत देण्यात आली आहे. शनिवारी (२४ मे) जयपूरमध्ये झालेल्या एका विशेष कार्यक्रमात प्रिती झिंटाने ही देणगी दिली. .या कार्यक्रमात प्रीती झिंटा असं म्हणाली, "आपल्या सैनिकांच्या धाडसी कुटुंबांना पाठिंबा देणे हा आपला सन्मान आणि आपली जबाबदारीही आहे. आपल्या सशस्त्र दलांनी दिलेल्या बलिदानाची आपण कधीही परतफेड करू शकत नसलो तरी, आपण त्यांच्या कुटुंबियांच्या पाठीशी उभे राहू शकतो. त्यांना पुढे जाण्यास मदत करू शकतो. आम्ही भारतीय सैन्याच्या शौर्यावर अत्यंत अभिमान बाळगतो आणि त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहोत."

## साराला फोटो काढल्याचा राग



सारा अली खान बुधवारी रात्री मुंबईतील एका थिएटरमध्ये दिसली. सारा तिच्या मैत्रिणींसोबत चित्रपट पाहायला गेली होती. तिथे ती पापाराझींवर संतापलेली दिसली. यावेळी सारा पांढऱ्या रंगाच्या सूटमध्ये पोहोचली होती. थिएटरच्या आतील एक व्हिडिओ सोशल मीडियावर समोर आला आहे. व्हिडिओमध्ये सारा तिच्या मैत्रिणींसोबत फूड काउंटरवर होती. यादरम्यान पापाराझी सतत तिचे फोटो काढत होते. आधी सारा हसली आणि पोझ देत बाय म्हणाली. पण पापाराझी ऐकले नाहीत आणि सतत तिचे फोटो आणि व्हिडिओ काढत राहिले, त्यानंतर सारा रागावली आणि ओरडली, 'सर, कृपया आता थांबा, मला हे आवडत नाही.' असे सारा म्हणाली.साराला पहिल्यांदाच रागात पाहून चाहते हैराण झाले आहेत आणि पापाराझीच्या या कृतीवर रागही काढत आहेत. साराला पाठिंबा देत एका यूझरने लिहिले की, 'ती अस्वस्थ नाही, पापाराझींनी तिला अस्वस्थ केले आहे'. दुसऱ्याने लिहिले, 'त्यांना एकटे सोडा'. तिसऱ्या यूजरने कमेंट करताना लिहिले की, त्याचेही वैयक्तिक आयुष्य आहे, त्यांना त्याचा आनंद घेऊ द्या.सारा अली खानच्या वर्कफ्रंटबद्दल बोलायचे तर 2 जून रोजी साराचा 'जरा हटके जरा बचके' हा चित्रपट प्रदर्शित झाला. या चित्रपटात विकी कौशल

## तृप्तीने घेतली दीपिकाची जागा

काही काळापासून संदीप रेड्डी वांगा दिग्दर्शित 'स्पिरिट' हा चित्रपट चर्चेत आहे. यापूर्वी प्रेक्षकांना या चित्रपटात दीपिका पादुकोण आणि साऊथ स्टार प्रभासची जोडी पाहायला मिळणार होती. परंतु अलीकडेच बातमी आली की, दीपिकाने या चित्रपटातून माघार घेतली आहे. त्याच वेळी आता निर्मात्यांनी या चित्रपटासाठी एक नवीन अभिनेत्री शोधली आहे. त्यांनी स्वतः एक पोस्ट शेअर करून याबाबतची घोषणा केली. ही अभिनेत्री दुसरी तिसरी कोणी नसून तृप्ती डिमरी आहे, जी दीपिकाची जागा घेणार आहे. संदीप रेड्डी वांगा यांनी त्यांच्या सोशल मीडिया हँडल इन्स्टाग्रामवर यासंबंधीची पोस्ट केली आहे. त्यामध्ये त्यांनी सांगितले आहे की, तृप्ती डिमरी 'स्पिरिट'मध्ये दिसणार आहे. हे शेअर करताना त्यांनी, 'माझ्या चित्रपटाची मुख्य अभिनेत्री आता ऑफिशियल झाली आहे', असे कॅप्शनमध्ये लिहिले आहे. प्रभास आणि तृप्तीचा हा पहिलाच चित्रपट असणार आहे, ज्यामध्ये प्रेक्षकांना त्यांची ऑनलाइन केमिस्ट्री पाहायला मिळेल.हा चित्रपट संदीप रेड्डी वांगा दिग्दर्शित करणार आहेत. त्याचबरोबर भूषण कुमार व प्रणय रेड्डी वांगा हे चित्रपटाचे निर्माते आहेत. यापूर्वी तृप्तीने संदीप रेड्डी वांगा व भूषण कुमार यांच्या 'ॲनिमल'मध्ये काम केले होते. टी-सीरिज व भद्रकाली पिक्चर्सद्वारे समर्पित 'स्पिरिट' हा चित्रपट मोठ्या प्रमाणात जगभरात मनोरंजन करण्यासाठी सज्ज आहे. या चित्रपटात प्रभास एका कणखर पोलिस अधिकाऱ्याच्या भूमिकेत दिसणार आहे. या चित्रपटात तो ड्रग्ज माफियांशी लढताना दिसणार असून, चित्रपट २०२६ मध्ये प्रदर्शित होणार आहे.दीपिका पदुकोण 'स्पिरिट'मध्ये प्रभासबरोबर दिसणार होती; पण नंतर बातमी आली की, दीपिकाने ४० कोटींच्या मानधनासह फक्त आठ तासांची शिफ्ट मागितली, ज्यामुळे तिचे निर्मात्यांशी मतभेद झाले.



## अनुष्का विराटसह पोहोचली अयोध्येत


अनुष्का शर्माबरोबर सध्या विराट कोहली वेगवेगळ्या धार्मिक स्थळांवर दिसत आहे. दोघांनीही रविवारी अयोध्येतील रामलल्लाचे दर्शन घेतले. त्यानंतर ते हनुमान गढी येथे गेले आणि बजरंग बलीचे दर्शन घेतले. हनुमान गढी मंदिरात विराट-अनुष्काच्या पूजेचा व्हिडीओही समोर आला आहे. जेव्हा ते हनुमान गढी मंदिरात पोहोचले तेव्हा पुजाऱ्याने त्यांना फुलांचा हार घातला. त्यादरम्यान चाहते त्यांची एक झलक पाहण्यासाठी उत्सुक होते. त्या प्रसंगी विराटने ऑफ-व्हाइट कुर्ता घातला होता; तर अनुष्का शर्मांने लव्हेंडर सूट घातला होता आणि दोघेही त्यांच्या मुलांशिवाय तेथे गेल्याचे दिसत होते. १२ मे रोजी कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती घेतल्यानंतर विराट पत्नी अनुष्कासह वृंदावनमध्ये प्रेमानंद महाराज यांचे दर्शन घ्यायला पोहोचला होता. दोघांनीही प्रेमानंद महाराजांशी आध्यात्मिक चर्चा केली.हनुमान गढी मंदिरातील त्यांच्या पूजेचा व्हिडीओही समोर आला आहे. हनुमान गढी मंदिराच्या पुजाऱ्याने त्यांना फुलांचा हार घातला. विराट आणि अनुष्काचा व्हिडीओ व्हायरल होताच चाहत्यांनी या जोडप्याचे



कौतुक केले.रविवारी दोघांनी हनुमान गढी मंदिराला भेट दिल्यानंतर त्याबद्दल माहिती देताना, हनुमान गढी मंदिराचे महंत संजय दास जी महाराज यांनी एएनआयला सांगितले की, विराट कोहली आणि अनुष्का शर्मा यांना अध्यात्माची खूप ओढ आहे. भगवान रामलल्लाचे दर्शन घेतल्यानंतर त्यांनी हनुमान गढी येथे आशीर्वादही घेतला. त्यांच्याबरोबर अध्यात्मावर काही चर्चाही झाल्या.अनुष्का शर्मा आपल्या स्टार क्रिकेटर पती विराट कोहलीला प्रोत्साहन देण्यासाठी नेहमीच मैदानावर हजर असते. शुक्रवारी (२३ मे) ती लखनऊच्या इकाना क्रिकेट स्टेडियमवर दिसली होती. अनुष्का शर्मा लवकरच 'चकदा एक्स्प्रेस' या चित्रपटात दिसणार आहे, जो क्रिकेटर झूलन गोस्वामी यांच्या जीवनावर आधारित आहे. या चित्रपटाच्या माध्यमातून ती सहा वर्षांनंतर

# हेनरिक क्लासेनचा क्लास!

## हेनरिक क्लासेनचं शतकी खेळीनंतर मोठं वक्तव्य




**।नवी दिल्ली। प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**सनरायझर्स हैदराबादने आयपीएल २०२५च्या इतिहासातील तिसरी सर्वात मोठी धावसंख्या उभारत केकेआरचा मोठा पराभव केला आहे. हैदराबादच्या फलंदाजांनी यंदाच्या मोसमातील अखेरच्या सामन्यात रौद्र रूप धारण करत धावांचा पाऊस पाडला.**

ट्रॅव्हिस हेड-अभिषेकची सुरुवात आणि हेनरिक क्लासेनच्या शतकासह २७८ धावांचा डोंगर उभारला आणि केकेआरचा ११० धावांनी मोठा विजय नोंदवला. आयपीएलच्या इतिहासातील ३ वेळचा चॅम्पियन संघ असलेल्या कोलकाता नाईट रायडर्स संघाचा हा धावांच्या अनुषंगाने सर्वात मोठा पराभव आहे. आयपीएल २०२५ चा हंगाम या दोन्ही संघांसाठी खूप वाईट होता, आयपीएलच्या गेल्या हंगामातील विजेते आणि उपविजेते असलेले हे संघ प्लेऑफच्या शर्यतीतून बाहेर पडले होते. पण हंगामाच्या शेवटच्या सामन्यात, सनरायझर्सने त्यांची पूर्ण ताकद दाखवली आणि गेल्या हंगामातील विजेत्या कोलकात्याला ११० धावांनी पराभव केला.दोन्ही संघांसाठी, हंगामाची सुरुवात ज्या पद्धतीने झाली त्याच पद्धतीने सांगता झाली. कोलकाता संघाला हंगामातील पहिल्याच सामन्यात दारुण पराभव पत्करावा लागला होता. आणि शेवटच्या सामन्यातही या संघाला मोठ्या पराभवाला सामोरे जावे लागले. दुसरीकडे, सनरायझर्सने आयपीएल २०२५ मध्ये त्यांच्या पहिल्याच सामन्यात २८६ धावांचा डोंगर उभारला होता. त्या सामन्यात इशान किशनने शानदार शतक झळकावले होते आणि संघाला मोठा विजय मिळाला होता. आता त्यांच्या शेवटच्या सामन्यातही सनरायझर्सने २७८ धावांची मोठी धावसंख्या उभारली, ज्यामध्ये हेनरिक क्लासेनचे वादळी शतक होते आणि नंतर मोठा विजय मिळवला.सनरायझर्सने या सामन्यात प्रथम फलंदाजी केली आणि ट्रॅव्हिस हेडने अभिषेक शर्मासह केवळ ७ षटकांत ९२ धावांची भागीदारी रचली. यानंतर, हेड आणि क्लासेन यांनी कोलकाताच्या गोलंदाजांची धुलाई केली.

### केकेआरचे इतर सर्व फलंदाज फेल

दोघांनी मिळून ८३ धावा जोडल्या आणि १३ व्या षटकापर्यंत संघाने १७५ धावा केल्या. क्लासेनची वादळी खेळी पाहायला मिळाली, क्लासेनने प्रथम फक्त १७ चेंडूत आपले अर्धशतक पूर्ण केले आणि नंतर ३७ व्या चेंडूत आपले शतक पूर्ण केले. हैदराबादने २० षटकांत ३ गडी गमावून २७८ धावा केल्या, जी आयपीएलच्या इतिहासातील तिसरी सर्वोच्च धावसंख्या आहे.प्रत्युत्तरात केकेआरचा संपूर्ण संघ १६८ धावांमध्ये सर्वबाद झाला. सुनील नरेनने चांगली सुरूवात केली. पण तो लवकर बाद झाला. यानंतर मनीष पांडे आणि हर्षित राणा यांनी अर्धशतकी भागीदारी केली संघाला २०० अधिक धावांपेक्षा पराभवापासून वाचवलं. मनीष पांडेने २३ चेंडूत २ चौकार आणि ३ षटकारांसह ३७ धावा केल्या. तर हर्षित राणाने २१ चेंडूत २ चौकार आणि ३ षटकारांसह ३४ धावा केल्या. तर रमणदीप सिंग ५ चेंडूत १३ धावा करत बाद झाला. याशिवाय केकेआरचे इतर सर्व फलंदाज फेल ठरले.

# शेवटच्या सामन्यात चेन्नईचा दमदार विजय!

## गुजरातची टॉप 2 मध्ये एन्ट्री करण्याची संधी हुकली

**।नवी दिल्ली। प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**आयपीएल २०२५ स्पर्धेतील ६७ वा सामना गुजरात टायटन्स आणि चेन्नई सुपर किंग्ज या दोन्ही संघांमध्ये पार पडला. अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर पार पडलेल्या या सामन्यात चेन्नई सुपर किंग्जने दमदार विजयाची नोंद केला आहे. या हंगामात चेन्नई सुपर किंग्ज संघाला हवी तशी कामगिरी करता आली नाही. मात्र एमएस धोनीच्या नेतृत्वाखाली खेळणाऱ्या चेन्नईने विजयाने शेवट केला आहे.**

या सामन्याबद्दल बोलायचं झालं तर, चेन्नई सुपर किंग्ज संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना चेन्नई सुपर किंग्जकडून सलामी जोडीने दमदार सुरूवात करून दिली. आयुष म्हात्रेने १७ चेंडूत ताबडतोड ३४ धावांची खेळी केली. तर डेवोन कॉनव्हेने ३५ चेंडूत ५२ धावांची खेळी केली. तिसऱ्या क्रमांकावर खेळताना उर्विल पटेलने ११ चेंडूत ३७ धावा केल्या. शेवटी डेवाल्ड ब्रेविसने गुजरातच्या गोलंदाजांचा चांगलाच समाचार घेतला. त्याने २३ चेंडूत ५७ धावांची वादळी खेळी केली. त्याला साथ देत रविंद्र जडेजाने नाबाद २१ धावांची खेळी केली. यासह चेन्नई सुपर किंग्ज संघाने २० षटकांअखेर ५ गडी बाद २३० धावा केल्या.



गुजरात टायटन्स संघाला हा सामना जिंकण्यासाठी २३१ धावा करायच्या होत्या. या धावांचा पाठलाग करताना सलामीला आलेल्या साई सुदर्शनने ४१ धावांची तुफानी खेळी केली. मात्र, शुबमन गिलला हवी तशी सुरुवात करून देता आली नाही. तो अवघ्या १३ धावा करत माघारी परतला. सलामी जोडी फ्लॉप ठरल्यानंतर जोस बटलरकडून मोठ्या खेळीची अपेक्षा होती. मात्र, तो अवघ्या ५ धावा करत माघारी परतला. शेरफेन रूदरफोर्ड ०, शाहरुख खान १९, राहुल तेवतीया १४ आणि राशिद खान अवघ्या १२ धावांवर माघारी परतला. शेवटी अरशद खानने २० धावा केल्या. मात्र, चेन्नईच्या धारदार गोलंदाजीसमोर गुजरातच्या फलंदाजांनी नांग्या टाकल्या. यासह चेन्नईने हा सामना ८३ धावांनी आपल्या नावावर केला. हा सामना जिंकून गुजरात टायटन्स संघाला गुणतालिकेत टॉप २ मध्ये एन्ट्री करण्याची संधी होती. मात्र, ही संधी गुजरातने गमावली आहे. आता मुंबई इंडियन्स, रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि पंजाब किंग्जकडे नंबर १ स्थानी पोहोचण्याची संधी आहे.अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर गुजरात टायटन्स आणि चेन्नई सुपर किंग्स या दोन्ही संघांमध्ये रोमांचक सामना पार पडला. या हंगामातील शेवटच्या सामन्यात चेन्नईने ८३ धावांनी विजय मिळवला. चेन्नईने या सामन्यातील पहिल्या डावात २३० धावा केल्या होत्या.

### माझ्याकडे अजूनही पुरेसा वेळ

धोनीचा आयपीएल कारकिर्दीतील शेवटचा सामना असेल. मात्र, सामन्यानंतर धोनीने निवृत्तीबाबत मोठा खुलासा केला आहे. हमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर पार पडलेल्या या सामन्यात चेन्नई सुपर किंग्जने दमदार विजयाची नोंद केला आहे. या हंगामात चेन्नई सुपर किंग्ज संघाला हवी तशी कामगिरी करता आली नाही.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

epaper.mahaenews.com

। सोमवार ।

। दि. 26 मे 2025।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

KAMALA Education Society

KAMALA EDUCATION SOCIETY'S

## PRATIBHA INSTITUTE OF BUSINESS MANAGEMENT

**AICTE Permanent ID: 1-3675161 | DTE Code: 6167**

Approved by AICTE | B+ NAAC Accredited | Permanently Affiliated to Savitribai Phule Pune University

# ADMISSIONS OPEN

Full Time Undergraduate Courses (3 Years Degree Course, 4 Years Honours)



## BBA

**Bachelor of Business Administration**



## BCA

**Bachelor of Computer Applications**

### Highlights:

- Advanced Industrial and Research Learning
- Proven Track Record of Placements
- Mentoring and Seed Funds for Startups
- Skill Development and Certification Courses
- Live Industrial Projects
- Earn and Learn Scheme of Rs. 10,00,000+
- Govt. and Management Scholarships
- State of the Art infrastructure
- ICT enabled classrooms

Eligibility: Passed HSC Examination with any stream

**Call for more details:**

**BBA : Prof. Gururaj - 8624991767 | Dr. Pallavi - 9225635556**

**BCA : Prof. Manish - 9823223336 | Prof. Surabhi - 9049004895**

www.pibmpune.org.in

Scan QR code to know more


MASTER MIND GLOBAL
SCHOOL & Jr. College
(CBSE)
( Since 2013)
ADMISSIONS
OPEN FOR
NURSERY TO 12TH
Where There is
Creativity, There is
Master Mind
Excellence in Education & Disciplined Environment
Co-Curricular & Extra Curricular Activities
Guaranteed Safety & Security
STAR
RANKING
A++ Grade
In Leadership & Quality
Management
Contact : +91 7218125125
E-mail : mastermindglobalschool.com
Website : www.http://mastermindglobalschool.com


Swami Vivekanand Shikshan Prasarak Mandal's
GAYATRI GROUP OF SCHOOLS,
PUNE
ADMISSIONS OPEN
2025-26
PRE-PRIMARY
TO
HIGHER-SECONDARY
For more info
95277 64646 / 77967 67292


Late Babanrao Gabaji Gawali Charitable Trust's
SPG INTERNATIONAL PUBLIC SCHOOL & JUNIOR COLLEGE
Powered by
JAI HIND EDUTECH
CBSE Affiliation No. : 1130741 • UDISE Code - 27252001012
BHOSARI CAMPUS : Sr. No. 203, Nr. Durwankur Lawns, Alandi Road, Bhosari, Pune-411039 (Maharashtra)
SPG INTERNATIONAL PUBLIC SCHOOL
Pre Primary to Class XII
LIMITED SEATS
Hurry up!!!
ADMISSION
OPEN
2025-2026
Bi-focal / Technical / Vocational Subject are available
For Science Stream
Computer Science
Crop Science
Electronics
Mechanical / Technical Automobile
Information Technology (IT)
For Commerce Stream
Banking
Marketing & Sales
Office Management
Small Industries & Self employment
Information Technology (IT)
CALL NOW : 9763441639 / 8657473241

CERTIFICATION COURSE BY MORAYA SHIKSHAN SANSTHA, CHINCHWAD



शिक्षणाबरोबरच सुसंस्कारित व्यक्तिमत्त्व घडविणारी शाळा

2025-26
ADMISSIONS
OPEN

प्रज्ज्वलितो ज्ञानमियो प्रदीपः

"यत् भावो – तत् भवति"

# मोरया शिक्षण संस्था, चिंचवड
# डिप्लोमा इन मॉन्टेसरी आणि नर्सरी शिक्षक प्रशिक्षण






* राष्ट्रीय स्तरावर वैध प्रमाणपत्र
* प्रात्यक्षिकवर भर,
* ग्रंथालय सुविधा
* अध्यापन शास्त्राबद्दलची माहिती
* बाल मानसशास्त्र व पोषण आणि खूप काही..

* शुल्क: १६,०००/- (२ हप्त्यांसह)
* १ सेमिस्टर कोर्स
* अभ्यासक्रम कालावधी: १५ जून २०२५ ते १५ डिसेंबर २०२५
* वेळ : सकाळी १० ते दुपारी २

प्लॉट क्र. 13, मोरया कॉलनी, सुदर्शन नगर, गोलांडे राम मंदिरासमोर, चिंचवड, पुणे 33

संपर्क
सुचित्रा आपटे - ९३२५१३२४०२
भाग्यश्री पंडित - ८०८७७०६१००